महाराष्ट्र शासन

सूचना का अधिकार

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.वैशिवस/अधिपरिचारीका/ई/५/२०१५ दिनांक:- 29/०१ / २०१६

## "नोटीफिकेशन"

**सरळसेवेने "अधिपरिचारीका" पदासाठी नेमणूक एम.एच.एन. सी.डब्ल्यू. टी. स्पर्धा परीक्षा-२०१४ मधील निवडयादीतील प्रतिक्षाधिन उमेदवारांना निवडपत्र/शिफारसपत्र निर्गमित करण्याबाबत (नांदेड व यवतमाळ)**

स्पर्धा परीक्षा एम.एच.एन.सी.डब्ल्यू.टी.-२०१४ च्या माध्यमातून मुळ प्रमाणपत्रे पडताळणीनंतर पात्र उमेदवारांना निवड यादीनुसार प्रवर्गनिहाय नियुक्ती/शिफारस पत्रे निर्गमित करण्यात आलेली असून, निवडयादीत प्रतिक्षाधिन असलेल्या पुढील उमेदवारांना नांदेड व यवतमाळ या संस्थेतील अधिपरिचारीकांची रिक्त पदे भरण्यासाठी फक्त उपरोक्त नमुद संस्थेकरीताच निवडपत्रे निर्गमित करण्यात येणार आहे.

संचालनालयातील नर्सिंग/परिचर्या (ई) विभागात व्यक्तिशः संपर्क साधून सोबतच्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहून आपली लेखी संमती दर्शविल्यानंतरच त्यांची उपरोक्त नमुद संस्थेमध्ये गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

सोबत प्रसिध्द केलेल्या एम.एच.एन.सी.डब्ल्यू.टी.-२०१४च्या गुणवत्ता क्रमांकानुसार व सोबतच्या वेळापत्रकानुसार जे उमेदवार या संचालनालयास,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई कार्यालयात लेखी संमती दर्शविणार अशा उमेदवारांचा विचार करण्यांत येईल. जे उमेदवार संचालनालयास संपर्क साधणार नाही अशा उमेदवारांचा विचार करण्यांत येणार नाही. राज्यस्तरीय गुणवत्तायादीतील जे उमेदवार उपरोक्त नमुद संस्थेतील नियुक्तीबाबतचे निवडपत्र स्विकारण्याबाबत लेखी हमीपत्र देतील फक्त अशाच उमेदवारांची राज्यस्तरीय गुणवत्तानुसार (प्रवर्गनिहाय) निवड करण्यात येईल. जे उमेदवार लेखी संमती दर्शविणार नाहीत त्यांचा नियुक्तीकरीता विचार होणार नाही व त्यांच्या पुढील क्रमांकाच्या राज्यस्तरीय गुणवत्तायादीच्या उमेदवाराचा विचार करण्यात येईल. त्यामुळे लेखी संमती दर्शविण्याची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील याची उमेदवारांनी विषेश नोंद घ्यावी.

तसेच ज्या उमेदवारांना नियुक्ती देण्यांत आलेली आहे. अशा उमेदवारांनी उपस्थित राहू नये. व ज्या उमेदवारांनी यापुर्वी पसंती अर्ज भरलेला आहे त्याच उमेदवारांनी संचालनालयात उपस्थित राहावे.

तथापि जे उमेदवार नांदेड व यवतमाळ, येथील नियुक्ती स्विकारण्यास लेखी संमती दर्शवितील, त्यांना शासन अधिनियमानुसार सदरील निवड केलेल्या संस्थेत शासन सेवेची ६ वर्षे झाल्याशिवाय इतरत्र कोणत्याही संस्थेत बदली अथवा दिलेल्या पदस्थापनेत बदल करुन देण्यात येणार नाही. तसेच ३ वर्षाची पूर्ण शासन सेवा पूर्ण झाल्याशिवाय ते वैयक्तिकरित्या किंवा इतर कोणत्याही माध्यमातून बदली मिळण्याकरीता विनंती अर्ज/शिफारसपत्र सादर करणार नाहीत. अशा आशयाचे लेखी "हमीपत्र" संमतीपत्रासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील ६१ पदे व स्त्री रुग्णालय, यवतमाळ येथील ११ पदे अशी एकूण ७२ पदे भरण्यासाठी खालील राज्यस्तरीय गुणवत्तायादीतील उमेदवारांनी खालील दिलेल्या वेळापत्रकानुसार व राज्यस्तरीय एम.एच.एन.सी.डब्ल्यू.टी.-२०१४ च्या गुणवत्ता क्रमांकानुसार त्या त्या संवर्गातील उमेदवारांनी उपस्थित रहावे.

MHN-CWT-2014

| Sr. No. | Date ,Day & Time | Vacant Post | MHN CWT-2014 SML No. | Total Candidates | Category |
|---|---|---|---|---|---|
| 1) | 04.02.2016<br>Thursday<br>10 am | Open:- 36 | 591 To 1131 | 108 | |
| 2) | 04.02.2016<br>Thursday<br>2 Pm | SC:- 9<br>ST:- 5<br>VJ:- 2 | 1189 To 1305<br>9982 To 10353<br>5862 To 6342 | 27<br>15<br>6 | SC, ST व VJ व्यतिरिक्त इतर उमेदवारांनी हजर राहू नये. |
| 3) | 05.02.2016<br>Friday<br>10 am | NT1:- 2<br>NT2:- 3<br>NT3:- 1 | 3067 To 3160<br>2407 To 2606<br>1513 To 1588 | 6<br>9<br>3 | NT1, NT2 व NT3 व्यतिरिक्त इतर उमेदवारांनी हजर राहू नये |
| 4) | 05.02.2016<br>Friday<br>2 Pm | OBC:- 12<br>SBC:- 2 | 1732 To 1916<br>3303 To 3781 | 36<br>6 | OBC व SBC व्यतिरिक्त इतर उमेदवारांनी हजर राहू नये. |
| | Total Post | 72 | | | |

सर्व उमेदवार आणि पालक यांनी उपरोक्त वेळापत्रक काळजीपूर्वक वाचावे. वेळापत्रकाप्रमाणे नमूद केलेल्या दिवशी आणि वेळी उमेदवारांनी **संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई** येथे उपस्थित रहावे. विद्यार्थ्यांनी येताना सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ कागदपत्रे व एक साक्षांकित छायाकिंत प्रतींचा संच सोबत आणावा. एस.एम.एल. क्र. ११३१ पर्यंतच्या खुल्या गटातील उमेदवारांसह इतर सर्व संवर्गातील उमेदवारांनी दि. ०४.०२.२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे. त्यानंतरच्या वरील वेळापत्रकामध्ये दिलेल्या कोणत्याही दिनांकास खुल्या गटातील एस.एम.एल. क्र. ११३१ नंतरच्या उमेदवारांनी हजर राहू नये.

**संचालक**
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई